## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर
### माहिती कक्ष, दिनांक ०३ ऑक्टोंबर
### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ६००/२०१७भादविसक२७९,३३७,४२७, मोवाकाक १८५ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | ०२/१०/१७ रोजी ०१.०० वा चे दरम्यान, सिध्देश्वर कन्या प्रशाला समोरुन डाव्या बाजुने जात असताना सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | ०२/१०/२०१७ रोजी ०३.३५ वा. |
| **फिर्यादी** | : | पोना/७१ राजशेखर निलप्पा माळी ने. सलगर वस्ती पोलीस ठाणे |
| **आरोपीचे नांव** | : | मो.सा.क्रं. एमएच-१३-बीएस-२६३९ चा चालक नामे अशोक भिमाशंकर कुरुलकर वय-४५ रा. टिळक चौक सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्याच्या ताब्यातील शासकीय वाहन क्रं.एमएच-१३-बीक्यु-००२१ ने नमुद ठिकाणाहुन जात असताना नमुद आरोपी मजकुर हा भरधाव वेगाने फिर्यादीने त्यांचे ताब्यातील वाहन हे डाव्याबाजुने घेवून ब्रेक दाबला तरी नमुद आरोपी हा फिर्यादीचे वाहनांस येवून धडकुन खाली पडला म्हणुन फिर्यादी व वपोनि श्री.काळे व पोना गायकवाड हे वाहनातुन ताबडतोब खाली उतरुन सदर जखमीस शासकीस वाहनात ठेवले त्यांच्या डोक्याला मार लागला होता व त्यांच्या तोंडाला दारु पिल्याचा आंबट उग्र वास येत होता.सदर आरोपी मजकुर जखमी यांस ताबडतोब रुग्णालय येथे उपचारांस दाखल करुन त्याचे कडील मोबाईलवर नातेवाईकांना संपर्क साधला असता त्याचे नाव अशोक भिमाशंकर कुरुलकर वय-४५ रा. टिळक चौक असे समजले. नमुद आरोपी त्याच्या ताब्यातील मो.सायकल ही दारुच्या नशेत हयगयीने निष्काळजीपणे चालवून नमुद शासकीय वाहनांस धडक मारुन समोरील उजव्या बाजुचे हेडलाईट व समोरील काच फुटल्याने अंदाजे १०,०००/-रु.चे नुकसान करुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाला म्हणुन.**तपास:- पोह/२६९/राठोड** |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ५५७/२०१७ भादविसक२७९,३३७,३३८,४२७,मोवाकाक१८४,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | ०१/१०/२०१७ रोजी चे १९.०० वा चे दरम्यान, एआरटी चौका जवळील चहा कॅन्टीन जवळ सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | ०२/१०/२०१७ रोजी ०२.५६ वा. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | : | महेश नागेश मड्डी वय-२९ व्यवसाय-प्लंबर,रा. घ.नं.१६ निलम नगर भारत चौक सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | बुलेट मो.सा. क्रं.एमएच-१३-सी-०५९६ चा चालक नाव माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्यांचे स्प्लेंडर मो.सा.क्रं. एमएच-१३-बीए-५४२९ वरुन विडी घरकुल येथील नातेवाईकाकडे जात असताना नमुद ठिकाणाहुन पायी चालत जाणारे इसमाने हात करुन लिफ्ट मागितल्याने मो.सायकल थांबवून वरील नमुद इसमांस पाठीमागील सिटवर बसवित असताना पाठीमागुन येणारे नमुद बुलेट मो.सायकल स्वाराने आपले ताब्यातील बुलेट मो.सायकल ही हयगयीने व अविचाराने भरधाव वेगात चालवून फिर्यादीचे मो.सायकलला जोरात धडक मारुन फिर्यादीचे डाव्या पायाचे नडगीचे हाड फॅक्चर केले व फिर्यादीचे पाठीमागे बसलेल्या इसमाचे डाव्या हाताच्या पोटरीचे हाड फॅक्चर करुन जबर दुखापत करुन फिर्यादीचे मो.सायकलचे सुमारे ५००/-रु. नुकसान करुन फिर्यादीस व फिर्यादीचे पाठीमागे बसलेल्या इसमांस उपचारास घेवून न जाता बुलेटसह पळुन गेला म्हणुन.<br><br>**तपास:- सफौ.अनंतकवळस** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ५५८/२०१७ भादविसक, ३२४,३२३,५०४,५०६,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | ०१/१०/२०१७ रोजी चे २०.३० वा चे दरम्यान, प्लॉ.नं.४ हिरा-मोती जवळ जुना विडी घरकुल सोलापुर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | ०२/१०/२०१७ रोजी ०५.३२ वा. |
| **फिर्यादी** | : | सदानंद व्यंकटेश यमुल वय-४२ व्यवसाय-कामगार रा.सदर |
| **आरोपीचे नांव** | : | कृष्णा व्यंकटेश यमुल वय-४० रा. सदर |
| **हकिकत** | | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादिचे व फिर्यादीचे बायकोचे भांडण चालू असताना नमुद आरोपी मजकुर (फिर्यादीचा भाऊ) याने तु बायकोस का भांडण करतो म्हणुन सोडविण्यास आला असता फिर्यादी त्यास तु तुझ्या पुरते बघुन घे आमच्यात कशाला पडतो असे म्हणताच चिडुन जावून हाताने मारहाणा करुन शिवीगाळ दमदाटी करुन तेथेच पडलेल्या लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले म्हणुन.**तपास:- पोह/११३६/शेख.** |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४५३/२०१७ भादविसक,३७९,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १९/०९/२०१७ रोजी चे ११.०० ते ११.४५ वा चे दरम्यान,मंगळवार बाजार परीसरांत सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | ०२/१०/२०१७ रोजी १६.५८ वा. |
| **फिर्यादी** | : | सौ.लता अरविंद पारखे वय-५० व्यवसाय-घरकाम रा.ई/१७/१८ भाग्योदय हौसिंग सोसायटी पारशी विहिरी जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ९,९९०/-रु.०१-सँमसंग ऑन सेवन कंपनीचा मोबाईल |
| **हकिकत** | : | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा मुलगा नामे रामप्रसाद अरविंद पारखे यांचे नावावर असलेला मोबाईल हा फिर्यादी व फिर्यादीचे पती अरविंद भगवानराव पारखे असे भाजी घेत असताना फिर्यादीच्या पतीच्या शर्टाच्या वरच्या खिशातील नमुद वर्णनाचा व किंमतीचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने खिशात हात घालून संमत्तीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरुन नेला म्हणुन.**तपास:- पोना/११०/सय्यद** |